Vidyawarta™
International Multilingual Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा व्दारा संचालित
आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

व्दारा आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १८ व १९ जानेवारी २०१९

# "जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव"

**मुख्य संपादक**

**डॉ. स्निग्धा राजेश कांबळे,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर

**सहसंपादक**

**डॉ. कुंदन दुफारे,**
श्री. जी. सी. पा. मुनघाटे महाविद्यालय, धानोरा, जि. गडचिरोली

**संपादक मंडळ**

**डॉ. अशोक सालोटकर,**
गो. वा. महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपुर

**डॉ. संजय कुंभारे,**
श्री गोविंदप्रभु कला, वाणिज्य महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**प्रा. संजय चव्हाण,**
यादवराव पोशट्टीवार महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**डॉ. विजय दिवोरे,**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर

**प्रा. बालाजी दमकोंडवार,**
नेवजाबाई हितकारीनी महाविद्यालय,
ब्रह्मपुरी, जि. चंद्रपुर

**डॉ. रविंद्र विखार,**
श्री गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय,
कुरखेडा, जि. गडचिरोली

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com



Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

39) समाजमाध्यमे व बदलते सामाजिक जीवन
डॉ. पद्मानंद मनोहर तायडे, वाशीम || 185

40) प्रसार माध्यम आणि स्त्री प्रतिमांचे वास्तव
प्रा. क्रिष्णा रा. पासवान, भंडारा || 187

41) सामाजिक चळवळी आणि माध्यमांची भूमिका
डॉ. दामोदर चंद्रभानजी दुधे, यवतमाळ || 192

42) समकालीन भारतीय समाजाच्या प्रश्नाच्या संदर्भात माध्यमांची भूमिका
कांबळे दलित सुभाषराव || 196

43) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि जनसवांद माध्यमांचा ...
प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड, कळंब || 200

44) भारतातील लिंगभाव, जाति व धर्म आणि माध्यमांचा हस्तक्षेप
प्रदिप सदाशिवराव निंदेकर, नागपूर || 204

45) प्रसार माध्यमे व बदलते ग्रामीण जीवन
श्री.नंदलाल भिमराव बर्डे || 210

46) मराठी वाहिनीवर दाखविल्या जाणाऱ्या कौटूंबिक मालिकांमधील ...
मोहिनी प्रकाश कनकदंडे, नांदेड || 212

47) स्त्रिमुक्ती चळवळ आणि माध्यमे
प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, कार्यकारी प्राचार्य, कळमेश्वर || 217

48) प्रसार माध्यमे आणि बदलते जीवन प्रवाह
प्रा. डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर || 219

49) भारतातील लिंगभेद, जाती व धर्म आणि माध्यमांचा आक्षेप
प्रा.गंगाधर वैजनाथ लांडगे, जिवती || 222

50) समाजमाध्यमावरील अफवांमुळे होणाऱ्या जमावहत्या (Mob Lynching)...
प्रा. डॉ. गजेंद्र कढव, गडचिरोली || 226

51) जागतिकीकरणाचा व महिती तंत्रज्ञानाचा भारतीय समाजावरील परिणाम
प्रा. किसन काशीनाथ घोगरे, वणी || 228

https://sites.google.com/site/vidyawartajournal/ http://www.vidyawarta.blogspot.com



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

**50**

## समाजमाध्यमावरील अफवांमुळे होणाऱ्या जमावहत्या (Mob Lynching) रोखण्यासाठी कठोर कायद्यांची गरज

**प्रा. डॉ. गजेंद्र कढव**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

***********

आज भारताला एका नवीनच समस्येने ग्रासले आहे. ते Mob Lynching म्हणजेच जमावाकडून होणाऱ्या हत्या. आज देशातील विविध राज्यांमध्ये अनेक ठिकाणी लहान मुले पळवून नेणारी टोळी किंवा गोरक्षणाच्या नावाखाली जमावाकडून निरपराध, निष्पाप लोकांच्या हत्या करण्यात आल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. निष्पाप आणि निरपराध लोकांच्या हत्या त्यांचा गुन्हा नसताना सुद्धा करण्यात आलेल्या आहेत. अशा निष्पाप लोकांची हत्या होणे हा एक चिंतेचा विषय आहे. म्हणूनच अशा हत्यांवर लवकरच तोडगा काढणे आवश्यक झाले आहे. अशा हिंसक घटनांना आळा बसावा म्हणून अशा घटना करणाऱ्या आरोपींना (जमावांना) कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. कारण काहीही कारण नसतांना एखाद्या व्यक्तीची हत्या करणे हे दुष्कृत्य अजिबात खपवून घेण्यासारखे नाही. भारतीय दंडसंहितेनुसार कोणालाही कायदा हातात घेता येत नाही. परंतु अशा हत्यांमध्ये मात्र काही लोकांकडून कायद्यांची अवहेलना करून निष्पाप नागरिकांची हत्या करण्यात येते. म्हणून झुंडशाहीतून अशा प्रकारच्या हत्या होऊ नयेत म्हणून यावर कठोर कायदा बनविणे आवश्यक आहे. कारण जमावाकडून होणारी हत्या सुद्धा एक गुन्हाच आहे. मग त्या हत्येचा कोणताही उद्देश असो. जर एखादा व्यक्ती अपराधी वाटला, तर त्या व्यक्तीची हत्या करावी हे कायद्याच्या दृष्टिकोणातून योग्य नाही. म्हणून जे लोक अशाप्रकारचे दुष्कृत्य करीत असतील त्यांच्यावर सुद्धा हत्येच्या कलमा लावणे आवश्यक आहे.

**झुंडशाहीमुळे घडलेल्या भारतातील काही घटना:—**

१. २२ जून रोजी जुनैद खान त्याचे भाऊ हासिम व शकीर तसेच त्याचा चुलत भाऊ मोईन हे ईदच्या खरेदीसाठी दिल्लीमध्ये आले होते. दिल्लीमध्ये खरेदी केल्यानंतर तिथून पलवलमधील खांदवली या आपल्या मुळ गावी परत जात असतांना जुनैद खान ला ट्रेनमध्ये हिंसक जमावाकडून झालेल्या हल्ल्यात आपला जीव गमवावा लागला. रेल्वे प्रवासादरम्यान जुनैद आणि त्याच्या भावंडांचे सिट वरून चार — पाच युवकांशी भांडण झाले. त्यानंतर या युवकांनी 'गोमास खाणारे' म्हणत जुनैद आणि त्याच्या भावंडांच्या डोक्यावरील टोपी उडवूण लावली. त्यांची दाढी ओढण्याचा प्रयत्न केला. भांडणानंतर जुनैद रेल्वेस्थानकावर उतरला. त्यावेळी जमावाकडून त्याला गोमांस खाणारे म्हणत मारहाण करण्यात आली. या मारहाणीत जुनैदला आपला जीव गमवावा लागला. अषाच घटना देशातील विविध प्रांतामध्ये घडत असल्याचे वारंवार समोर आले आहे.

२. दुसरी प्रमुख जमाव हत्या घटना महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यामध्ये घडली. ही सुद्धा काळजाचा थरकाप उडविणारी घटना आहे. मुलं चोरणाऱ्या टोळीच्या संशयावरून 'राईनपाडा' इथं जमावाकडून ५ जणांची निघृण हत्या करण्यात आली. गेल्या काही दिवसापासून समाजमाध्यमावर महाराष्ट्रात मुले चोरणारी टोळी फिरत आहे, अशी अफवा पसरत होती. याच अफवेने राईनपाडा येथे पाच लोकांची हत्या करण्यात आली.

राईनपाडा येथे मुले चोरणारी टोळी फिरत असल्याची अफवा मोठ्या प्रमाणात पसरली होती. ठिकठिकाणी परिसरात अफवेची चर्चा होत होती. याच अफवेच्या संशयावरून काही लोकांनी पाच व्यक्तींना आपल्या ताब्यात घेतले आणि त्यांना प्रचंड मारहाण केली. या मारहाणीत त्या पाचही निरपराध लोकांना आपला जीव गमवावा लागला.

३. भारतातील तिसरी प्रमुख घटना कर्नाटकातील बिदर येथे घडली. जिथे मुले चोरण्याच्या संशयावरून



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli